## प्रेसनोट

दि.१३/०९/२०२२

### पुणे महानगरपालिकेच्या स्वारगेट पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंत्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ६० वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - व्यंकटेश लक्ष्मण पाटील, वय ४७ वर्षे, कनिष्ठ अभियंता. नेमणूक - स्वारगेट पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- ( तीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३०,०००/- ( तीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- १२/०९/२०२२

सापळा दिनांक :- १३/०९/२०२२.

ठिकाण :- स्वारगेट पाणीपुरवठा विभाग कार्यालय.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे ठेकेदार असून, पुणे महानगरपालिका स्वारगेट पाणी पाणी पुरवठा विभागातील धायरी परिसरातील पाण्याविषयक केलेल्या कामांचे प्रलंबित असलेले सुमारे चार लाख रूपयांचे देयक मंजूर करून देण्यासाठी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, स्वारगेट पाणी पुरवठा विभागातील धायरी प्रभाग क्र. ३३ व ३३ क परिसरामध्ये तक्रारदार यांनी पाण्याविषयी केलेल्या कामांचे प्रलंबित असलेले देयक मंजूर करून देण्यासाठी लोकसेवक व्यंकटेश पाटील यानी तक्रारदारांकडे ३० हजार रूपयांची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारल्यावर रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.